**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 02.08.2019.**

उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन, ता.भोकरदन, जि.जालना येथील अनिल प्रभाकरराव कुलकर्णी, वय 55 वर्षे, व्यवसाय नोकरी, टंकलेखक कनिष्ठ सहायक, **यांना 500/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | अनिल प्रभाकरराव कुलकर्णी, वय 55 वर्षे, व्यवसाय नोकरी, टंकलेखक कनिष्ठ सहायक, उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन, ता.भोकरदन, जि.जालना |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 02/08/2019 रोजी उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन, ता.भोकरदन येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 500/- रुपये |

याबाबत हकीगत अशी की, तक्रारदार यांचे मालकीची मौजे वरुड बु. शिवारामध्ये गट क्रमांक 706 मध्ये 1200 चौ.मि.शेत जमिन आहे. सदर शेत जमिनीचा तक्रारदार यांना अकृषक परवाना काढावयाचा असल्यांने व त्यासाठी त्यांना उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन येथुन नाहरकत प्रमाणपत्र पाहिजे असल्यांने तक्रारदार यांनी सदर कार्यालयास रितसर अर्ज सादर करुन संबंधीत टंकलेखक कनिष्ठ सहायक, श्री अनिल प्रभाकरराव कुलकर्णी, वय 55 वर्षे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन, ता.भोकरदन, जि.जालना, रा.श्रीकृष्ण मंगलकार्यालया जवळ, जाफ्राबाद रोड भोकरदन, जि.जालना. यांचेशी त्यांचे कामासंबंधाने संपर्क केला असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे काम करण्यासाठी 1000/- रु. लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना श्री.अनिल प्रभाकरराव कुलकर्णी, वय 55 वर्षे, व्यवसाय नोकरी, टंकलेखक कनिष्ठ सहायक, उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन, यांना लाच देण्याची ईच्छा नसल्यांने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि.26.07.2019 रोजी उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन, ता.भोकरदन, जि.जालना, येथे जावुन पंचासमक्ष पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान पंचा समक्ष श्री .अनिल प्रभाकरराव कुलकर्णी, टंकलेखक कनिष्ठ सहायक, उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन यांनी तक्रारदार यांचेकडे नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी 1000/- रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती तक्रारदार यांचे कडुन दि. 02/08/2019 रोजी पंचासमक्ष 500/- रुपये स्विकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. श्री.अनिल प्रभाकरराव कुलकर्णी, टंकलेखक कनिष्ठ सहायक, उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग भोकरदन यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823142632, 9767747774 वर संपर्क करावा.**

(रविंद्र डी. निकाळजे)
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.